सणासुदीत 'एफडीए' ची राज्यभर धडक कारवाई

१९ कोटींचा भेसळयुक्त अन्नसाठा जप्त!



मुंबई (वृत्तसंस्था)

सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि भेसळमुक्त अन्न मिळावे, यासाठी महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात विशेष तपासणी मोहीम राबवली आहे. ऑक्टोबर २०२६ मध्ये राज्यातील सर्व ७ विभागांमधील ११४ अन्न व्यावसायिक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत तब्बल १९.०१ कोटी रुपये किमतीचा सुमारे ३.५३ लाख किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला. गंभीर त्रुटी आढळलेल्या अन्न व्यावसायिकांचे परवानेही निलंबित करण्यात आले आहेत.

एफडीएच्या तपासणीत खाद्यतेल, मसाले, तांदूळ, डाळी, गूळ, तूप, मिठाई, नमकीन, सुकामेवा, बेकरी उत्पादने आणि इतर अन्नपदार्थांचा समावेश असलेला साठा जप्त करण्यात आला. कोकण विभागातील भिवंडी येथील अव्हेन्यू सुपरमार्ट्स लि. या आस्थापनातून १,४४,२१८ किलो खाद्यतेलाची सर्वात मोठी एकल जप्ती करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे मिथ्याछाप किंवा भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून २,२७९.७ लिटर पतंजली गाईचे तूप जप्त करण्यात आले. या साठ्याची किंमत १.२० कोटी रुपयांहून अधिक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर विभागांतील नमकीन, मिठाई आणि मसाले उत्पादक आस्थापनांमध्ये स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळल्या. काही ठिकाणी खाद्यतेलाच्या पुनर्पॅकिंगसाठी जुन्या डब्यांचा वापर, अन्नपदार्थांमध्ये रंगाचा वापर, चुकीचे लेबलिंग आणि आवश्यक नोंदींचा अभाव आढळून आला. रवी ऑईल इंडस्ट्रीजच्या अचानक तपासणीत ८६ पैकी केवळ ३० गुण मिळाले. प्रयोगशाळा अहवाल, फूड-ग्रेड पॅकिंग प्रमाणपत्रे आणि स्वच्छतेच्या आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने संबंधित आस्थापनाचा परवाना निलंबित करण्यात आला.१३ एफआयआर; १६ जणांना अटक २८ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रतिबंधित अन्नपदार्थांविरोधात सघन कारवाई करण्यात आली. या प्रकरणांमध्ये १३ एफआयआर दाखल करण्यात आले, १६ व्यक्तींना अटक करण्यात आली, ७ आस्थापना सीलबंद करण्यात आल्या आणि ६ वाहने जप्त करण्यात आली.

TATA 1mg च्या Marine Collagen Powder **उत्पादनाच्या लेबलिंग आणि जाहिरातींमध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याच्या आरोपावरून** FSSAI **ने संबंधित उत्पादक, विपणनकर्ता तसेच** Amazon आणि Flipkart **यांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. त्वचा, केस, नखे आणि सांध्यांसाठी केलेले दावे, उत्पादनाच्या श्रेणीचे लेबलिंग आणि तुलनात्मक जाहिराती याबाबत आक्षेप नोंदवण्यात आले आहेत.**

नागरिकांनी परवानाधारक विक्रेत्यांकडूनच अन्नपदार्थ खरेदी करावेत. पॅकिंगवरील बॅच क्रमांक, उत्पादन तारीख आणि Best Before तपशील तपासावेत. संशयास्पद किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास एफडीएच्या १८००-२२२-३६५ या टोल-फ्री क्रमांकावर तक्रार करावी, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

माझ्याकडे चार नाही तर अनेक ऑडिओ क्लिप्स - मनोज जरांगे

जालना (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आता राज्य सरकार आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री यांना थेट आणि इशारा दिला आहे. माझ्याकडे फक्त चार ऑडिओ क्लिप्स नाहीत, तर अशा अनेक क्लिप्स आहेत. जर सरकारने आमच्याविरोधात सुरू असलेले हे षडयंत्र थांबवले नाही, तर मी लवकरच आणखी काही ऑडिओ बॉम्ब फोडणार आहे, असा खळबळजनक इशारा जरांगे यांनी दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला विरोध करणारे काही मराठा समाजातीलच चेहरे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर जरांगे यांनी गंभीर आरोप केला आहे की, हे सर्व



राज्य सरकारचे आणि त्यातही प्रामुख्याने देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांचे षडयंत्र आहे. पैसे देऊन आमचेच मराठा कार्यकर्ते, मराठा समाजाच्या महिला यांना फोडण्याचे आणि आमच्याच मागे लावण्याचे काम जाणीवपूर्वक केले जात आहे, असा थेट आणि गंभीर आरोप जरांगे यांनी केला आहे.जरांगे म्हणाले, माझ्याकडे चार ऑडिओ क्लिप्स नाहीत, खूप आहेत. जर एकनाथ शिंदे साहेबांनी आणि फडणवीस साहेबांनी हे षडयंत्र बंद नाही केले, पैसे देऊन आमच्याच समाजाचे लोक आणि महिला फोडण्याचे काम थांबवले नाही, तर काही महिन्यांनंतर आणखीन बॉम्ब पडणार आहेत. या संवादातून मनोज जरांगे यांनी केवळ सध्याच्या आंदोलनावरच भाष्य केले नाही, तर आगामी राजकीय परिस्थिती आणि निवडणुकांवरही आपली नजर असल्याचे स्पष्ट केले आहे. २०२९ च्या निवडणुकांमध्ये मला काही विशिष्ट लोकांची जिरवायची आहे, असे जरांगे यांनी स्पष्ट सांगितल्याने, त्यांचा रोख नेमका कुणाकडे आहे, याची आता राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, कालही जरांगेंनी पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यामध्ये ते म्हणाले, मराठ्यांना मला हे सांगायचे आहे की तुम्ही पटवून घ्या आता, या गोष्टीची मानसिकता तयार करा.

घारगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार बाबासाहेब बोरसे यांची बदली

संदिप वऱ्हाडे यांच्याकडे प्रभारी पदभार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर पोलीस दलात प्रशासकीय स्तरावर महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, संगमनेर उपविभागांतर्गत येणाऱ्या घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब दगडू बोरसे यांची पोलीस नियंत्रण कक्ष, अहिल्यानगर येथे तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आली आहे. यासंदर्भात अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिकृत आदेश जारी केला आहे.



पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आस्थापना शाखेमार्फत काढण्यात आलेल्या आदेशानुसार, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांची घारगाव पोलीस ठाण्यातून पोलीस नियंत्रण कक्ष, अहिल्यानगर येथे पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षात हजर होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, बोरसे यांची बदली झाल्यानंतर घारगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार पोलीस निरीक्षक संदिप सुकदेव वऱ्हाडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. वऱ्हाडे हे सध्या अहिल्यानगर येथील टी.एम.सी. येथे नियुक्त आहेत. त्यांना पुढील आदेश होईपर्यंत घारगाव पोलीस ठाण्याचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर उपविभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या संदर्भित अहवालाच्या अनुषंगाने ही प्रशासकीय कार्यवाही करण्यात आल्याचे आदेशात नमूद आहे.

गिऱ्हेवाडीतील अवैध दारूविक्रीवर आमदार खताळांचा छापा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आमच्या वाडीत अनधिकृत देशी दारूची विक्री सुरू आहे. वाडी-वस्तीवरील अनेक तरुण दारूच्या आहारी गेले आहेत. या दारूमुळे आमचे संसार उघड्यावर पडत आहेत. घरातील कष्टाची कमाई दारूवर खर्च होत असल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. साहेब, तुम्ही आम्हाला दिवाळीचा आनंदाचा शिधा दिला आहे; मात्र अशा परिस्थितीत हा आनंदाचा शिधा आम्ही खायचा तरी कसा? अशा शब्दांत संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पठारच्या गिऱ्हेवाडी येथील महिलांनी आमदार अमोल खताळ यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. महिलांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेत आमदार खताळ यांनी घारगाव



पोलिसांना कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर त्या तक्रारदार महिलांच्या समवेत स्वतः आमदार अमोल खताळ व घारगाव पोलिसांनी संबंधित ठिकाणी जाऊन जनावरांच्या कडबा चाऱ्याखाली एका महिला दारू विक्रेत्याने लपवून ठेवलेला देशी दारूचा साठा जप्त केला,

उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या दिवाळीचा शिधा 'चे वाटप हिवरगाव पठार गावांतर्गत येणाऱ्या गिऱ्हेवाडी, पायरवाडी आणि सुतारवाडी या आदिवासी वाडी-वस्ती मध्ये राहणाऱ्या गोरगरीब कुटुंबांना आमदार खताळ पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. त्या कार्यक्रमा प्रसंगी या वाडीतील महिलांनी अवैध दारूविक्रीचा प्रश्न आमदार खताळ यांच्या निदर्शनास आणून दिला. व साकूर पठार भागातील विविध वाडी - वस्त्यांवर देशी दारूची अवैध विक्री सुरू असल्याने अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. कुटुंबातील पुरुष दारूच्या व्यसनाच्या आहारी जात असल्याने घराची जबाबदारी महिलांवर पडत आहे. मुलांचे संगोपन, शिक्षण आणि घरखर्च भागविताना महिलांची ओढाताण होत आहे. कष्टाने कमावलेला पैसा घराच्या गरजांसाठी खर्च होण्या ऐवजी दारूवर खर्च होत असल्याने कुटुंबांपुढे आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. या अवैध दारूविक्रीला आळा घालून महिलांचे संसार उद्ध्वस्त करणारा हा व्यवसाय कायमचा बंद करावा, अशी आर्त मागणी महिलांनी आमदार खताळ यांच्याकडे केली. महिलांनी मांडलेल्या व्यथेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी तातडीने पोलीस अधिकाऱ्यांसमवेत संबंधित ठिकाणी भेट दिली. घारगाव पोलिसांच्या उपस्थितीत जनावरांच्या चाऱ्यात लपवून ठेवलेल्या देशी दारूच्या बाटल्यांचा साठा शोधून जप्त करण्यात आला आहे. यावेळी साकुर येथील मुख्य दारू विक्रेते शंकर खेमनर यांना आम्हाला हसा द्यावा लागत असल्याचे दारू विक्री करणाऱ्या महिलेने आमदार खताळ यांच्यासमोर सांगितले आमदार अमोल खताळ यांनी तातडीने केलेल्या या कारवाईचे गिऱ्हेवाडी, पायरवाडी व सुतारवाडी परिसरातील महिलांनी स्वागत केले.

फडणवीसांच्या नावाने मंत्रालयात फसवणुकीचा खेळ!

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विशेष कार्य अधिकारी असल्याचा बनाव रचून एका नामांकित कंत्राटदाराला तब्बल ३.२५ कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या भामट्याला मुंबईच्या मरीन ड्राइव्ह पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील ४० वर्षीय आसिफ इस्माईल पठाण असे या अटकेतील तोतया अधिकाऱ्याचे नाव आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रलंबित असलेली ५० कोटी रुपयांची बिले मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून आरोपीने हे कोट्यवधींचे कमिशन उकळले होते. एवढी अवाढव्य रक्कम लाटल्यानंतरही आरोपीने आणखी ७५ लाख रुपयांची मागणी केल्याने कंत्राटदाराला संशय आला आणि या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश झाला.

अकोला येथील नामांकित 'ओबेरॉय कन्स्ट्रक्शन'चे कंत्राटदार रणजीतसिंग ओबेरॉय यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सुमारे ५० कोटी रुपयांची बिले दीर्घकाळापासून प्रलंबित होती. आरोपी आसिफ पठाण याने कंत्राटदार ओबेरॉय यांच्याशी संपर्क साधून आपण मंत्रालयात वरिष्ठ पदावर असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी असल्याचे भासवले. आपल्या शब्दाबाहेर मंत्रालयातील एकही फाईल जात नाही, असा विश्वास त्याने निर्माण केला. ५० कोटी रुपयांची थकबाकी तातडीने मंजूर करून देतो, असा दावा करत आरोपीने कमिशनच्या नावाखाली ओबेरॉय यांच्याकडून वेळोवेळी तब्बल ३.२५ कोटी रुपये उकळले.गुन्ह्याचा कट रचताना आरोपीने अत्यंत पद्धतशीरपणे कंत्राटदाराला जाळ्यात ओढले. ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे आरोपीने ओबेरॉय यांना १० सप्टेंबर रोजी मुंबईत बोलावून घेतले. मंत्रालयाच्या परिसराचा आणि जवळच्या ठिकाणांचा संदर्भ देऊन आरोपीने आपल्या एका साथीदारामार्फत १.२५ कोटी रुपयांची रोकड प्रत्यक्ष स्वीकारली. कंत्राटदाराकडून ३.२५ कोटी रुपये उकळल्यानंतरही आरोपीची हाव संपली नाही.

नंदू कोळेकर यांना 'आयडॉल शिक्षक पुरस्कार' जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: तालुक्यातील हजारवाडी पानोडी येथील रहिवासी व सध्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळवडे केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे उपक्रमशील व कृतीशील शिक्षक नंदू बाळासाहेब कोळेकर यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (डउएठढ) यांच्यातर्फे सन २०२६-२७ चा प्रतिष्ठेचा 'आयडॉल शिक्षक पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आणि त्यांनी राबविलेल्या उपक्रमांचा गौरव झाला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नंदू कोळेकर यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे शिक्षण दिले. शिक्षणाप्रती असलेली समर्पित वृत्ती यांमुळे त्यांनी



शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यांनी केलेले कार्य शिक्षकांसाठी आणि समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या यशामुळे हजारवाडी पानोडी गावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणारा मार्गदर्शक असतो, या विचारातून कोळेकर यांनी आपले अध्यापन कार्य सुरू ठेवले आहे. त्यांनी राबविलेले शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन इतर शिक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरत आहेत.

कुंभमेळ्यापूर्वी गोदावरीचा कायापालट, स्वच्छतेसाठी ८० कर्मचाऱ्यांची फौज!

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. नदीपात्रात सांडपाणी मिसळणे, जलपर्णी आणि कचऱ्यामुळे प्रदूषण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने गोदावरी स्वच्छतेसाठी विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. नदीपात्रातील जलपर्णी काढणे आणि स्वच्छतेसाठी स्वतंत्रपणे ८० कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असून, जलपर्णी हटवण्यासाठी नवीन स्क्रिमर यंत्र खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



ध्वजारोहणाने सिंहस्थ कुंभपर्वाला सुरुवात झाल्यानंतर गोदावरी प्रदूषणाचा प्रश्न चर्चेत आला आहे. शहरातून सुमारे २१ किलोमीटर अंतरापर्यंत वाहणाऱ्या गोदावरी नदीत सांडपाणी मिसळत असल्याने तसेच नदीपात्रातील जलपर्णी आणि कचऱ्यामुळे पाण्याचे प्रदूषण होत असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अलीकडेच महापालिकेला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कुंभमेळ्यातील अमृतस्नानासाठी सुमारे नऊ महिन्यांचा कालावधी शिल्लक असल्याने त्यापूर्वी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी महापालिकेने स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामांना गती दिली आहे.गोदावरी तसेच उपनद्यांच्या पात्रातील जलपर्णी काढणे, कचरा हटवणे आणि नदीपात्र स्वच्छ ठेवण्यासाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी ८० स्वच्छता कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. यासंदर्भातील निविदा प्रक्रिया प्रगतिपथावर असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.नदीकाठच्या स्वच्छतेसाठी महापालिकेचे स्वतंत्र पथक कार्यरत आहे. मात्र, नदीपात्रातील स्वच्छतेची जबाबदारी नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर सोपवली जाणार आहे. यामध्ये सर्वाधिक कर्मचारी गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी तैनात करण्यात येतील.नदीपात्रातील पाणवेली आणि जलपर्णी काढणे, प्लास्टिक तसेच अन्य कचरा हटवणे आणि नदीपात्र स्वच्छ ठेवणे ही प्रमुख कामे या कर्मचाऱ्यांकडून केली जाणार आहेत.

गोदावरी प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने सांडपाणी व्यवस्थापनावरही लक्ष केंद्रित केले आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुमारे दीड हजार कोटी रुपयांची सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारणे आणि अस्तित्वातील केंद्रांचे सक्षमीकरण करण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत.याशिवाय नदीपात्रालगतच्या सांडपाणी वाहिन्यांचे स्थलांतर केले जात आहे. नदीत थेट सांडपाणी मिसळण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

गोदावरी नदीपात्रातील जलपर्णी काढण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण व गोदावरी संवर्धन कक्षाकडून नवीन स्क्रिमर यंत्र खरेदी करण्यात येणार आहे. या यंत्राच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरू असल्याची माहिती महापालिकेच्या पर्यावरण व गोदावरी संवर्धन कक्षाच्या प्रमुख तथा उपायुक्त डॉ. संगिता नांदूरकर यांनी दिली. नदीपात्रात धार्मिक विधींनंतर निर्माल्य आणि प्रसादाचे साहित्य टाकले जात असल्याने कचऱ्याची समस्या वाढत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यात देशभरातून साधू-महंत, भाविक आणि पर्यटक गोदावरीच्या काठावर दाखल होणार आहेत. त्यामुळे नदीपात्र स्वच्छ ठेवणे आणि प्रदूषण नियंत्रणात आणणे महापालिकेसमोर महत्त्वाचे आव्हान ठरणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी गोदावरी नदी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी ८० कर्मचारी, सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे सक्षमीकरण आणि स्क्रिमर यंत्र खरेदी अशा उपाययोजनांवर महापालिकेने भर दिला आहे.

अतिवृष्टी, पूरस्थिती बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा

राज्य सरकारकडून २९१ कोटींची मदत मंजूर

मुंबई (वृत्तसंस्था)

यंदाच्या वर्षी जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून २९१ कोटी ९१ लाख ४ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. यापैकी शेतीपिकांच्या नुकसानीसाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार, तर शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात येणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. याबाबतचे शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीबाबत ३ लाख ९ हजार २८९ बाधित शेतकऱ्यांच्या २ लाख ६८ हजार ९१८ तर २९ हेक्टर क्षेत्रासाठी २६२ कोटी ६९ लाख ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कोकण आणि नाशिक विभागातील बाधित शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणाऱ्या मदतीचा लाभ सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर आणि नंदुरबार जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना होणार आहे. शेतीपिकांच्या नुकसानीची मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी सांगितले.अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतजमिनीचेही नुकसानअतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले होते. राज्यात शेतपिकाचे नुकसान झालेल्या ३४ हजार ९८४ शेतकऱ्यांच्या ७ हजार ६७५.४० हेक्टर क्षेत्रासाठी २९ कोटी २१ लाख ९ हजार रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अमरावती, नागपूर, कोकण, नाशिक आणि पुणे विभागांतील यवतमाळ, बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव, सातारा आणि पुणे जिल्ह्यांतील बाधितांचा यात समावेश आहे.दरम्यान, शेतजमिनीच्या नुकसानीसाठी जमीनमालक असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना विहित दराने जास्तीत जास्त दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत मिळेल.